एम.बी.बी.एस. व बी.डी.एस. या अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेत सुधारणा करण्याच्या दृष्टीने भारताच्या सर्वोच्च न्यायालयाने प्रिया गुप्ता विरुध्द छत्तीसगड राज्य व इतर या प्रकरणी दिनांक ०८.०५.२०१२ रोजी दिलेल्या निर्देशांच्या अनुषंगाने मार्गदर्शक सूचना विहित करणेबाबत...

# महाराष्ट्र शासन

## वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभाग

शासन निर्णय क्रमांक डब्ल्युपीएम १०१२/प्र.क्र.१६५/१२/शिक्षण-२
"मंत्रालय," गो.ते. रुग्णालय संकुल, ९वा मजला, लोकमान्य टिळक मार्ग,
मुंबई ४०० ००१. दिनांक : ०४.०७.२०१३

**वाचा** :

१. शासन परिपत्रक, वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभाग, क्रमांक डब्ल्युपीएम १०१२/प्र.क्र.१६५/१२/शिक्षण-२, दिनांक २९.०५.२०१२
२. शासन शुध्दीपत्रक, वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभाग, क्रमांक डब्ल्युपीएम २०१२/प्र.क्र.१६५/१२/शिक्षण-२, दिनांक ०४.०७.२०१२

**प्रस्तावना**

प्रिया गुप्ता विरुध्द छत्तीसगड राज्य व इतर [विशेष अनुमती याचिका (सिव्हिल) क्रमांक २७०८९/२०११ मधील सिव्हिल अपील क्रमांक ४३१८/२०१२] या प्रकरणी मा. सर्वोच्च न्यायालयाने दिनांक ०८.०५.२०१२ रोजी दिलेल्या न्यायनिर्णयातील परिच्छेद क्रमांक ३० व ३१ मध्ये देशभरातील संस्थांमधील एम.बी.बी.एस. व बी.डी.एस. या आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेत सुधारणा करण्याच्या दृष्टीने काही स्थायी निर्देश दिले आहेत. या निर्देशांचा सुयोग्य अर्थउकल करुन त्याआधारे दिनांक २९.०५.२०१२ च्या समक्रमांकित शासन परिपत्रकान्वये आवश्यक त्या मार्गदर्शक सूचना विहित करण्यात आल्या होत्या. त्यातील सूचना क्रमांक (h)

कडे लक्ष वेधण्यात येत आहे. सुलभ संदर्भासाठी उक्त सूचना खाली उध्दृत करण्यात आली आहे.

> "उक्त दुसरी फेरी घेण्यात आल्याच्या दिनांकापासून सात दिवसांनंतर उक्त अभ्यासक्रमांच्या रिक्त जागा राज्य शासनास प्रत्यर्पित झाल्याचे समजण्यात येईल. सदर जागा शासनातर्फे घेण्यात आलेल्या सामाईक प्रवेश परीक्षेतील गुणवत्तेच्या आधारे शासनाने नियुक्त केलेल्या उक्त सक्षम प्राधिकाऱ्याकडून संबधित शैक्षणिक वर्षाच्या १५ सप्टेंबर पर्यत भरण्यात येतील. त्यासाठी समुपदेशनाची स्वंतत्र फेरी घेण्यात येणार नाही."

२. तथापि, दिनांक ०४.०७.२०१२ च्या समक्रमांकित शुध्दीपत्रकान्वये असे स्पष्ट करण्यात आले की, उपरोक्त सूचना क्रमांक (h) ही "खासगी महाविद्यालयांना/ अभिमत विद्यापीठांना लागू राहणार नाही." वास्तविक पाहता उक्त सूचना ही उपरोक्त न्यायनिर्णयातील परिच्छेद क्रमांक ३१ मधील खंड (f) मधील निर्देशानुसार विहित करण्यात आली आहे. त्यामुळे उक्त शुध्दीपत्रक रद्द करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. या संदर्भात महाराष्ट्राच्या महाधिवक्त्यांचा सल्ला घेऊन शासनाने आता खालील निर्णय घेतला आहे.

## शासन निर्णय

शासन शुध्दीपत्रक, वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभाग, क्रमांक डब्ल्युपीएम १०१२/प्र.क्र.१६५/१२/शिक्षण-२, दिनांक ०४.०७.२०१२, याद्वारे, रद्द करण्यात येत आहे.

२. शासन परिपत्रक, वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभाग, क्रमांक डब्ल्युपीएम १०१२/प्र.क्र.१६५/१२/शिक्षण-२, दिनांक २९.०५.२०१२, मधील सूचना क्रमांक (h) खालील प्रमाणे वाचण्यात येईल.

"उक्त दुसरी फेरी घेण्यात आल्याच्या दिनांकापासून सात दिवसांनंतर उक्त अभ्यासक्रमांच्या रिक्त जागा राज्य शासनास प्रत्यर्पित झाल्याचे समजण्यात येईल. ह्या जागा शासनातर्फे किंवा, यथास्थिती, भारत सरकारतर्फे घेण्यात आलेल्या सामाईक प्रवेश परीक्षेतील गुणवत्तेच्या आधारे शासनाने नियुक्त केलेल्या उक्त सक्षम प्राधिकाऱ्याकडून संबधित शैक्षणिक वर्षाच्या १५ सप्टेंबर पर्यंत भरण्यात येतील. त्यासाठी समुपदेशनाची स्वंतत्र फेरी घेण्यात येणार नाही."

३. उक्त शासन परिपत्रकाचे सर्व संबंधितांनी काटेकोरपणे अनुपालन करावे.

४. हा शासन निर्णय तात्काळ अंमलात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

कृ.भि. केंगा

**( कृ.भि. केंगा )**
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
मा. उप मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
मा. मंत्री (वैद्यकीय शिक्षण) यांचे खासगी सचिव
मा. राज्यमंत्री (वैद्यकीय शिक्षण) यांचे खासगी सचिव
महासंचालक, माहिती व जनसंपर्क, मंत्रालय, मुंबई
संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
संचालक, आयुष संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक.
कार्यालयीन सचिव, प्रवेश नियंत्रण समिती/ शिक्षण शुल्क समिती, २०५, गव्हर्नमेंट पॉलिटेक्नीक बिल्डींग, ४९, खेरवाडी, अलियावर जंग मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१

सचिव, असोसिएशन ऑफ मॅनेजमेंटस् ऑफ अनएडेड प्राइवेट मेडिकल ॲण्ड डेंटल कॉलेजस् ऑफ महाराष्ट्र, श्रीजी हाऊस, मिंट रोड, फोर्ट, मुंबई ४०० ००१.

सर्व अधिष्ठाता/ प्राचार्य, सर्व खासगी विनाअनुदानीत वैद्यकीय/ दंत महाविद्यालये (महाराष्ट्रातील)

सर्व कुलसचिव, सर्व अभिमत विद्यापीठे (महाराष्ट्रातील)

सचिव, भारतीय आयुर्विज्ञान परिषद, पॉकेट-४, सेक्टर-५, द्वारका, नवी दिल्ली ११० ०७७

सचिव, भारतीय दंत परिषद, ऐवान-ए-गालीब मार्ग, कोटला रोड, टेम्पल लेन, नवी दिल्ली ११० ००२

कक्ष अधिकारी (शिक्षण-१), वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभाग, मुंबई

निवडनस्ती (शिक्षण-२)